झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-२/ १४२२ /२०२४
दिनांक :-१०/०९/२०२४

वाचले-

१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अन्वये दि.१५/०३/२०२४ रोजीची झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबतची पूर्वसूचना "जाहिर नोटीस".

२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे यांचेकडील दि.०५/०९/२०२४ रोजीचे निकालपत्र.

---

"झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)"
महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३क अन्वये अंतिम आदेश

<u>प्रस्तावना-</u>

सि.स.नं.४६३८, स.नं.१२४/९, भीमनगर हडपसर, पुणे येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

(१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत ; आणि

(२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.१५/०३/२०२४ रोजीची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन सदरची पूर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र जून २७ ते जुलै ०३, २०२४ पृष्ठ क्र.२५ व २६ वर तसेच दैनिक वृत्तपत्रात दि.२५/०७/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.१४/०६/२०२४ रोजी डकवून प्रसिध्द करण्यात आली आहे ; आणि

(३) ज्याअर्थी, सदर पूर्वसूचनेची प्रत जागा मालक यांना व एक प्रत माहितीस्तव मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना देण्यात आली आहे. पूर्वसूचनेद्वारे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते.

(४) ज्याअर्थी, सदर नोटीसवर दि.०९/०७/२०२४ रोजी श्री. राजेंद्र तपस्वी यांनी हरकत/आक्षेप अर्ज झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दाखल केला असता प्राप्त हरकत/आक्षेप अर्जाच्या अनुषंगाने हरकतदार व योजनेचे विकसक यांची उक्त अधिनियमातील तरतुदीअन्वये सुनावणी घेऊन त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली. सुनावणी अंती दोन्ही उभय पक्षकार यांचे लेखी व तोंडी युक्तीवाद विचारात घेवून त्याबाबतचे

स्वतंत्र निकालपत्र पारित करण्यात आले असून हरकतदार यांचा हरकत/आक्षेप अर्ज दि.०५/०९/२०२४ रोजीच्या आदेशान्वये निकाली काढण्यात आले आहे.

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टीच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश :-

(१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्यासंदर्भातील दि.१५/०३/२०२४ रोजीची जाहिर नोटीस (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याची पूर्वसूचना) कायम करुन खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करणे शक्य आहे.

अनुसूची

झोपडपट्टीचे नाव :- सि.स.नं.४६३८, स.नं.१२४/९, भीमनगर हडपसर, पुणे
महानगरपालिका क्षेत्र :- पुणे महानगरपालिका.

| गाव- हडपसर, पुणे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| सि.स.नं.४६३८, स.नं.१२४/९ | खाजगी | ३४००.०० चौ.मी. | स.नं. १२४/१० | कॅनॉल | स.नं १२४/८ | स.नं १२४ पार्ट |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १० / ०९ /२०२४

(नीलेश र. गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

o/c

प्रत-

१. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव सादर.
२. मे.एस,आर.टाऊनकॉन प्रा.लि.- सि.स.नं.४२०,नारायण पेठ, मानिकप्रभू कॉम्प्लेक्स,लक्ष्मी रोड,पुणे ४११०३० - यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.